रत्नागिरी टाइम्स
कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक

**11 August 2023**

# समुद्रात आतापासूनच मासळीच्या पैदासीसाठी कृत्रिम भित्तिका तयार करणे गरजेचे : डॉ. जो. किझाकुडण

दापोली, १० ऑगस्ट (वार्ताहर) : समुद्रात नैसर्गिकरित्या मच्छि उपलब्धतेचे प्रमाण घटत चालले आहे. समुद्रात मच्छि उपलब्ध असेल तरच मासेमारांचा मच्छिमारी व्यवसाय टिकून राहील. दिवसेंदिवस या ना त्या कारणामुळे समुद्रातील मच्छिच्या घटत चाललेल्या प्रमाणामुळे मच्छिमारांच्या कुटुंबाच्या रोजी रोटीचा प्रश्न भविष्यात निर्माण होण्याची अधिक शक्यता आहे. त्यासाठी समुद्रात आतापासूनच मासळीच्या पैदासीसाठी कृत्रिम भित्तिका तयार करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट प्रतिपादन डॉ. जो किझाकुडण यांनी पाजपंढरी येथे बोलताना व्यक्त केले.

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय रत्नागिरी यांच्यावतीने दापोली तालुक्यातील पाजपंढरी येथील हर्णै पाज मच्छिमार सहकारी संस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी दापोली तालुक्यातील हर्णै, पाजपंढरी, केळशी, उटंबर, आडे, बुरोंडी, दाभोळ, ओणनवसे आदी गावातील मच्छिमार बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रीय सामुद्री मत्स्य संशोधन संस्था मंडपम, तामिळनाडूचे (सी.एम.एफ. आर.आय) प्रधान शास्त्रज्ञ डॉ. जो. किझाकुडण हे उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासोबत सी.एम.एफ. आर.आयचे तांत्रिक अधिकारी वैभव म्हात्रे, दाभोळ परवाना अधिकारी दिप्ती साळवी, हर्णै पाज मच्छिमार सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष रामचंद्र पावसे उपस्थित होते.

नैसर्गिकरित्या मासळीच्या पैदासीला विविध कारणाने मर्यादा आल्याने आता मानव निर्मित साहित्य वापरून समुद्रात स्थानिक मच्छिमारांच्या संमतीने समुद्रात कृत्रिम भित्तिका उभारणे गरजेचे झाले आहे. कृत्रिम भित्तिका म्हणजे मानवनिर्मित साहित्य समुद्रामध्ये एका विशिष्ट जागेमध्ये सोडून त्यामध्ये समुद्र प्रवाळ तयार होण्यास मदत करणे, या समुद्री प्रवाळामुळे समुद्रामधील जैवविविधता, उत्पादकता वाढविण्याकरिता मदत होईल यांच्या जवळ मासळी आसऱ्याला जागा तयार होत असल्यामुळे प्रजननाकरिता जागा मिळते, अशी माहिती डॉ. जो. कुझाकुडण यांनी उपस्थितांना दिली.

या कार्यक्रमासाठी हर्णै पाज हर्णै मच्छिमार संस्थेचे सचिव किशोर वाघे, संस्थेचे माजी अध्यक्ष किरण दोरकुळकर, काळसिध्देश्वर सोसायटीचे अध्यक्ष रामचंद्र खोपटकर, दापोली, मंडणगड, गुहागर, मच्छिमार संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष बालकृष्ण पावसे, दाभोळ खाडी मच्छिमार संस्थेचे सुनिल दाभोळकर, ओणनवसे सहकारी संस्थेचे वामन खडपकर, गुहागर तालुक्यातील नवानगर सोसायटीचे संचालक दुर्वास बणकर, हरेश कुलाबकर, सोमनाथ पावसे, वृशांत भाटकर, राजेंद्र गायकवाड, अमेय दाढेकर, मिलिंद राऊत आदींसह मच्छिमार बांधव उपस्थित होते.



कृत्रिम भित्तिका उभारण्याबाबचे मच्छिमार बांधवांना मार्गदर्शन करताना डॉ. जो. किझाकुडण, परवाना अधिकारी दिप्ती साळवी व अन्य. (शशिकांत राऊत)